REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# ‘‘आदिवासी जमातीचा समाशास्त्रीय मागोवाः विशेष संदर्भाने स्त्री’’



**Mr. Satish Pandurangrao Patil**
**Dy.CEO Govt. of Maharashtra.**
**EX.Director - Dr.Ambedkar Competitive Examinition Centre (ACEC ) YASHADA, PUNE.**
**EX. Director -National Institute Of Post Harvesting Technology ( NIPHT ) PUNE.**
**Govt. Of Maharashtra.**

## प्रस्तावना

भारतीय आदिवासी जामातींचा कुठल्याही स्वरुपाची पुर्ण मान्य व्याख्या अजून प्रचलित होऊ शकली नाही तशा अनेक मानवशास्त्रज्ञानी वेळोवेळी जमातींच्या व्याख्या दिलेल्या आहेत. परंतु या व्याख्या केवळ परिस्थितिक आहेत व त्या व केवळ कुठल्यातरी एका जमातीसाठी उपयुक्त ठरतात. त्यामुळे त्यांची उपयोगीता सिमीत आहे.

ज्या समाजाला आदिम समाज किंवा जमातीय समाज ही संज्ञा दिली जाते ते जगाच्या जवळपास सर्वच भागात आढळतात. अपवाद फक्त युरोप आहे. परंतु, मानवशास्त्राची उत्पती पाश्चात शास्त्रज्ञांचीची देणगी असल्याने जमातीच्या अध्ययनच्या प्रांरभ सर्वप्रथम इंग्लंड व इतर युरोपीय विव्दानांनी आणि अमेरिकेच्या काही विचारवंताची केला आहे. परंतु इंग्रज किंवा युरोपातील विचारवंतानी आपल्या सामाजिक, सांस्कृतिक राजकीय व वांशिक पार्श्वभूमीमुळे त्यांच्यासाठी संस्कृतीबाहेरील सर्वच समाज आदिम होते.

भारतीय संदर्भात आदिवासींचे अध्ययन करताना त्यासाठी त्यांचा ऐतिहासिक मागोवा घेणे आवश्यक ठरते. कारण या देशात हजारो वर्षापासून विभिन्न वंशिक जमातींच्या समुहांची वास्तव्य आहे. वेळोवेळी येथे विविध समुदाय प्रवेश करत गेले. परंतु कालांतराने या सर्व समूहांची संस्कृती व परंपरा भारतीय समाजाने एक अंग बनली फार पुर्वीपासूनच जमातीय समाज इतर जाती समाजाबरोबर सांस्कृतिक देवाणघेवाण करत आलेला आहे. त्यातील काही जमाती पुर्णपणे येथील समाजव्यवस्थेत मिसळून गेल्या काही जमाती जातीव्यवस्थेच्या अगदीच जवळ आल्या तर अनेक जमाती हिंदू जातीव्यवस्थेच्या अंग बनल्या. हेच ऐक कारण असे आहे ही ज्यामुळे अनेक संदर्भात जाती आणि जमाती यांना वेगवेगळे करणे ही एक समस्या बनली. तेव्हा भारतीय संदर्भात जमातीच्या संकल्पनेचे पुर्ण स्वष्टीकरण होणे आवश्यक आहे.

‘जमात’ या शब्दाची उत्पती तसेच अर्थविषयी वेगवेगळया विचारधारा आहेत. रोमवासीयांसाठी (Tribe) एक राजकीय संस्थेच्या रुपात होती. भारताच्या संदर्भात पाश्चात जगतात जमात शब्दाचा अर्थ आजच्या प्रचलीत अर्थाहून वेगळा होता. भारतात असे मानले जाते की, भारत देशाचे नांव शक्तीशाली असलेल्या ‘भारत’ जमातीपासून घेतले आहे. आदिवासी हि संज्ञा ही प्रथमतः बिहा येथे १९३० मध्ये ए.व्ही ठक्कर यांनी वापरली.

भारताच्या आदिवासी जमातींना विचारवंतानी वेगवेगळया नावांनी संबोधले आहे. प्रसिध्द मानवशास्त्रज्ञ एच.एल.रिंजले, लेके, ग्रिसर्यन सोलर्ट, टेलेट्रस सेनविक, मार्टिन आदिवासी शब्दाने संबोधिले केले. हट्टनने त्यांना प्राचीन (Primitive Tribe) जमाती म्हटले आहे. एल्विनने बैगा जमातीला

आदिस्वामी (Primitive Tribe) म्हटले आहे. बेन्स ने वन्य जाती (Jungle Prople, forest Tribes of flok) म्हटले आहे. गुहा यांनी ऑस्ट्रीक भाषा बोलणाऱ्या लोकांबाबत अशाच आशयाने निरिक्षण केले आहे. इ.स. १८६१ पासून जमातीसंबंधी विविध जनगणनांमध्ये भिन्नता आहे. इ.स. १८९१ च्या लोकसंख्या अहवालात लोकसंख्या आयुक्त श्री. जे.एन.बेन्स यांनी जातींना जातींच्या श्रेणीअंतर्गत त्यांनी वन्य जमातींच्या नावाने एक वेगहे उपशीर्षक बनवले. इ.स.१९११ मध्ये त्यांना जमातीय प्रवृत्तिवादी किंवा जमातीय धर्मपालन करणारे लोक म्हटले गेले. सन १९२१ मध्ये जमातीय धर्मपालन करणारे लोक म्हटले गेले. सन १९२१ च्या लोकसंख्या अहवालात त्यांना पहाडी व वन्यजमाती असे नाव दिले गेले. सन १९३१ च्या लोकसंख्या अहवालात त्यांना आदिम जमाती म्हटले गेले. भारत सरकार अधिनियम सन १९३५ मध्ये जमातींच्या लोकसंख्येला मागास जमातीचे नाव दिले गेले. सन १९४१ च्या लोकसंख्या अहवालात त्यांना केवळ जमाती म्हटले गेले. वर्तमानकाळात पाश्चात लेखकांच्या मतानुसार जमात शब्दाचा अर्थ सामान्यतः भौगोलिकदृष्टया विलम अथवा अर्थविलग एक प्राचीन वंशी समूह आहे. ज्यांना एका निश्चित सीमा क्षेत्राच्या परिघात ओळखले जाते त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृजिक परंपरा व प्रथा भिन्न आहेत. भारतीय परिप्रेक्षात या शब्दाच्या अर्थामध्ये विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अधिकरच परिवर्तन झाले आहे. या समुदायाचे सामाजिक स्तरानुसार अनेक प्रकार आहेत.

जसे प्राचीन जमाती (Primitive Tribe), प्राचीन जमाती किंवा आदिस्वामी (Primitive Tribe Or iboriginal)] आदिम जमाती (Abrginal Tribe) इत्यानी आणि पहाडी जमाती (Forest Tribe), जंगली तथा पहाडी जमाती (Forest and hill Tribe), आंतरिक जमाती (Indigenous Tribe), आदिवासी, जंगली तथा जिप्सी जमाती (Forest and Gypsy Tribe), मागासलेल्या जमाती (Backward Tribe), अपराधिक जमाती (Criminal Tribe), विचिक व अपराधिक जमाती (Wandering and Criminal Tribe), इत्यादी क्रोबरच्या मते आदिम जमाती म्हणजे अशा लोकांचा एक समुहे आहे. ज्यांची स्वतःची एक सामान्य संस्कृती असते. श्रीकांत यांच्या मतानुसार 'जमाती' भारतात विभिन्न काहामध्ये वेगवेगळया नावांनी ओळखल्या गेल्या. जसे अरण्यक, रानीपरज आणि आदिवासी प्रसिध्द सामजशास्त्रज्ञ जी.एस.घुर्ये यांनी त्यांना तथाकथित आदिवासी (Socalled Aborigines), किंवा मागासलेल्या हिंदू (Backward Hindus) असे म्हटले.

परिघाबाहेरच्या आदिवासी जमातीचे जीवन आपल्या नजरेने पाहण्याची त्यांच्या आयुष्यात डोकावण्याची ही कार्यशाळा म्हणजे खिडकीच. (संधी)

भारताची लोकसंख्या १२० कोटी असुन त्यात १० कोटी ७२ लाख भटक्या जमातीची संख्या आहे. ही लोकसंख्या एकूण लोकसंखेच्या १० टक्के पेक्षा अधिक आहे.

महाराष्ट्रात आदिवासींची लोकसंख्या ७३.१८ लाख म्हणजे एकुण लोकसंखेच्या ९.२७ टक्के आहे. भारताच्या स्वातंत्रयात ७३ वर्षे पुर्ण होउनही हे लोक मतदान हक्क, रहिवासी दाखला, रेशन कार्ड, शिक्षण, आरोग्य इ.पासून वंचित आहेत.

१. आदिासी समाज हा आज मोठया स्थित्यंतराच्या अवस्थेत आहे. त्यांच्या जीवनास योग्य ते मार्गदर्शन झाले पाहिजे, राजकीय हक्क दिल्याने, शिक्षणाने, संस्कृती लादल्याने त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत.

सुदैवान महाराष्टातील आदिवासी हे रानटी स्थितीत नाहीत. इतर समाजाशी त्यांचा संपर्क वाढत आहे. आदिम जीवनाला एक आंतरिक मूल्य आहे. त्यांची संस्कृती समृध्द आहे. त्यांचे आप्तसंबंध, विधी, इ.नी सामाजिक जीवन नियंत्रित आहे. ख-या अर्थाने भारतीय संस्कृतीचे जतन आदिवासी समाजानेच केले आहे. शब्दसंपत्तीने भरलेली भाषा लोकगीते, म्हणी, जात, मंत्र, धर्म यामुळे त्यांच्या समाजजीवनाला संपन्नता लाभलेली आहे. आदिवासी संस्कृती टिकवण्यात स्त्रीचा फार मोठा वाटा आहे. धर्मांतराच्या प्रक्रियेमुळे नेमके काय होईल याचा विचार होणे गरजेचे आहे.भारताच्या विकासात साधारणतः ८० ते ८५ पुरुष तर १० ते १५ टक्के स्त्रियांचा वाटा आहे.

- आजही स्त्रीयांच्या संदर्भात ही टक्केवारी कमीच आहे. निसर्ग नियमाने स्त्री – पुरुष प्रमाण सम आहे. लोकसंख्येत स्त्री – पुरुष प्रमाण ५०–५० टक्के असताना विकासाच्या संधी पासून, शिक्षणापासून हे प्रमाण वंचित आहे.

आदिवासी समाजात स्त्री जीवनाचे कांही वेगळेच पैलू पहावयास मिळतात. येथे स्त्रीला सर्वच बाबतीत समान हक्क, समान दर्जा दिलेला आहे. आजही कांही जमातीत मातृसलाक कुंटूंब पध्दती अस्तित्वात आहे.

आदिम स्त्रीला कौटुंबिक जीवनात, वैवाहिक जीवनात, सामाजिक जीवनात पुरुषाच्या बरोबरीचा दर्जा आहे.

२. भारत सरकारच्या व महाराष्ट शासनाच्या परिपत्रकानुसार महाराष्ट्रामध्ये एकुण ४७ छोटया – मोटया आदिवासी जमाती राहतात. यातील काही जमातींची नोंद कागदोपत्री नाही काही जमातींनी आपली प्राचीन संस्कृती, पारंपारिक लोककथा, लोकगिते, रुढी, परंपरा, दैवत कथा, लोकजीवन आजपर्यंत जपून ठेवलेले आहे. त्यांच्या विशिष्ट सांस्कृतिक जीवनाचा व साहित्याचा ठसा कायम त्या भागात दिसून येतो.

आदिवासी आजही रानावनातून व डोंगराच्या आश्रयाने राहतात त्यामुळे प्रगतांपासून उपेक्षित राहतात. महाराष्ट्रामध्ये आजही अनेक जमाती भटके जीवन जगतात. तर कांहीच्या वर जन्मतः गुन्हेगारीचा शिक्का मारलेला आहे. जन्माने गुन्हेगार म्हणून त्यांच्यावर अनेक बंधने टाकण्यात आली. गुन्हा करण्याचे कारण नियमित रोजगाराचा अभाव व नैतिकतेची उपेक्षा अतिरिक्त दडपशाही विद्रोहाला आमंत्रित करते.

एखाद्या वस्तीमध्ये पुरुषमंडळी दिवसा राहत नाहीत. संपूर्ण संसाराचा गाडा स्त्रिया सांभाळतात.

३. आदिवासी स्त्री ही मुळातच बंडखोर आहे. अ.सु.जा आ.साहित्य गुन्हेगारीचा, शिक्का स्वातंत्र्या नंतरही पुसलेला नाही. आजही वा–यावरच जिणं, पोलिसांच्या धाडी, अन अब्रुचा चव्हाटा हीच परिस्थिती आहे.

- **महाराष्ट्रातील आदीवासीच्यां मुख्य जमाती व उपजमाती**

| | |
|---|---|
| १. आंध | २५ कोकणा |
| २. बैगा | २६. कोल |
| ३. बरडा | २७. कोलाम |
| ४. बायचा | २८. ढोर कोळी |
| ५. मैना | २९. महादेव कोळी |
| ६. भारिया | ३०. कोंध |
| ७. भाया | ३१. कोरकू |
| ८. भिल्ल | ३२. कोया |
| ९. भ ुजिंया | ३३. नागसिया |
| १०. बिसवार | ३४. नाईकडा |
| ११. बिरकुल | ३५. ओशव |
| १२. चोभरा | ३६. परधान |
| १३. धानका | ३७. पारधी |
| १४. धनवार | ३८. परना |
| १५. धोडिंया | ३९. पढेलिया |
| १६. दुबना | ४०. पोयला |
| १७. गामित | ४१. राठवा |
| १८. गोंड | ४२. अवर |
| १९. हलबा | ४३. ठाकूर |

२०. कयार ४४. भोटी
२१. काथोडी ४५. वारली
२२. कवर ४६. मल्हार कोळी
२३. खैरबार ४७. बरेलिया
२४. खारिया

आदिवासी साहित्य – डॉ. सुदाम जाधव

महाराष्ट्र राज्यातील एकुण आदिवासी लोकसंख्याचे १९८१,१९९१,२००१ च्या जनगणने नुसार स्त्री पुरुष प्रमाण १००० हजारात

| अ.क्र. | एकुण आजमाती | स्त्री | पुरुष | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ १९८१ | एकुण | ३२४,१५ | ३०३,६९ | ६२७,८४ |
| | जमातीची | २९,२४ | २८,४८ | ५७,७२ |
| २. १९९९१ | एकुण | ४०८,२५ | ३८१ख्र२ | ७८९,३७ |
| | जमातीची | ३७,१८ | ३६,०० | ७३,१८ |
| ३. २००१ | एकुण | ५०,४० | ४६,४७८ | ९६,८७९ |
| | जमातीची | ४,३४८ | ४,२२९ | ८,५७७ |

- **महाराष्ट्रातील आदिवासी समाज व स्त्री जीवन**

महाराष्ट्रातील विविध आदिवासी जमातीतील स्त्री जीवन

१. **आंध्र** – आंध्र या नावावरुन ते आंध्रप्रदेशातुन आले असावेत. आंध्र मराठी भाषा बोलतात.
आध्र स्त्रिया साडी आणि चोळी वापरतात. त्यांचे दागिने मराठी लोकांप्रमाणे असतात. त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. आंधाच्या स्त्रिया देव-देवतांच्या विषयीची श्रध्दाभाव जात्यावरच्या ओवी गीता तुन व्यक्त करतात. लग्नविधीत स्त्रीया गीत गातात. आंध स्त्रीयांच्या ओव्याचे स्वरुप मराठी स्त्री – गीतासारखे असते.
आंधाचे जीवनमान सुधारत आहे. एकंदरित स्त्री जीवन स्वच्छंदी, कष्टी, संसार णांरुन नेणारी आहे.

२. **भिल्ल** – भिल्ल ही भारतातील मोठी जमात आहे. विलसन यांच्या मते 'भिल्ल' हा तमिळ शब्द असून त्यांचा अर्थ धनुष्य असा होतो. धनुष्य हे भिल्लांचे वैशिष्टपुर्ण हत्यार आहे. भिल्ल मराठी गुजराती बोलतात.
स्त्रीयांचा पारंपारिक पोशाख म्हणजे छोटे लुगडे आणि चोळी, त्यांना अलंकाराचे वेड असते. कानात, नाकात हातात पायात गळयात घालण्याचे अनेक अलंकार त्या वापरतात. जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य असते. लग्न मुलीच्या घरी पार पाडते. मुलीला मानधन देण्याची प्रथा आहे. विधवा विवाहास मान्यता आहे. म्हणजेच आदिम जमातीमध्ये स्त्रीयांना विविध अनिष्ठ प्रथा रुढीमध्ये बंदीस्त केलेले नाही. सांस्कृतिक दृष्टया ते पारंपारिक असुनही आधूनिकता व शिक्षणाचा प्रभाव पडला आहे.

३. **गावीत** – गावित म्हणजे गावचे यांची मातृभाषा भिल्ली आहे. वेशभूषा मराठमोळी असते. दागिन्यांमध्ये विविधता असते. कानात फूल्या, हातात पाटली, बांगडया, पायात साखळया, जोडवी, गळयात गंठण, इ. आभूषणे स्त्रीया वापरतात स्त्रींया कपाळावर हातावार गोदूंन घेतात सणावाराला गाणी व नृत्य करतात नाचामध्ये स्त्री – पुरुष दोघेही सहभागी होतात.

४. **धनका** – धनका जमात ही भिल्लांचीच उपशाखा समजली जाते. धनका स्त्रियांना नटण्याची खूप आवड असते. त्या दागिन्यांनी नख शिखांत मढलेल्या असतात. गोंदविण्याचा प्रकारही आवडीने केला जातो. शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. विवाह पध्दती आणि धर्म अतिशय क्लिष्ट व अभ्याणाजोगा आहे. धनका स्त्री पुरुष एकत्र नृत्य व सण समारंभ साजरे करतात. धनका जमातीत स्त्रीला महत्वाचे स्थान आहे.

५. **धोडिया** – ही एक जुनी आदीवासीजमात आहे. विवहानंतर स्वतंत्र राहण्याची परवानगी दिली जाते. ख–या अर्थाने आश्रम व्यवस्थेचे पालन इथे दिसते. विधवा स्त्रीची उपेक्षा इथे होत नाही. तर तिला विवाहास मान्यता दिली जाते. हिंदू धर्मांचे वारसाहक्काचे नियम धोडियामध्ये पाळले जातात, याचे दैनंदिन राहणीमान अतिशय स्वच्छ व आरोग्यपूर्ण असते.
शिक्षणाच्या प्रसारामुळे हा समाज सुशिक्षित होत आहे.

६. **दुबळा** – दुबळा म्हणजे अशवत अतिशय कष्टमय जीवन दुबळा हे सामान्य शेतकरी आणि मजूर होते. स्त्री – पुरुष दोघेही काम करीत दुबळा समाज हा पुरुषप्रधान आहे. विधवा विवाहास मान्यता आहे. विवाहसंस्थेचे नियम पाळले जातात.

७. **हलबा** – हलबा लोकांची संस्कृती ही त्यांची स्वतःची पारंपारीक संस्कृती आणि हिंदू संस्कृती यांचा मिलाप आहे. हलबा स्त्रीयांना दागिन्यांची भरपूर हौस असते. विवाहाचे नियम लवचिक आहेत. घटस्फोट सहज घेता येतो. स्त्रिया घरातील सर्व कामांची जबाबदारी सांभाळतात.

८. **कातकरी** – कातकरी संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे. विवाहानंतर जोडपे लगेच विभक्त राहते. वारसा हक्क मुलाला जातो. स्त्री पुरुष ढोलाच्या तालावर नाच करताना स्त्रीया लुगडे – चोळी घालतात. ववचित दागिने वापरतात. स्त्रीला कुटुंबात मानाचे स्थान आहे.

९. **कोकणा** – कोकणा संस्कृती अत्यंत साधी असते. या समाजात एकदाच विवाह करण्याची पध्दत असली तरी अनेक पलीत्व अस्तित्वात आहे. घटस्फोट पुनविवाहाची पध्दत आहे.
सामाजिक, धार्मिक व आर्थिक कार्यात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने सहभागी असतात. काळाप्रमाणे आधूनिक जगाबरोबर ते बदलत आहेत.

१०. **कोलम** – कोलम लोक कोलवार आणि पुजारी या नावाने सुध्दा ओळखले जातात. ेलवान म्हणजे असे लोक जे डुकराची शिकार करतात. कोलम हिंदू धर्म पाळतात. एकविवाह रुढ आहे.
कोलम स्त्री शेतकामात पुरुषांच्या बरोबर काम करते, कोलम स्त्री काळानुरुप बदलत आहे. (पोशाख)

११. **ढोर कोळी** – ऐंथोवनच्या म्हणण्यानुसार ढोर म्हणजे पशुधन या
शब्दापासून ढोर कोळी हे नाव तयार झाले असावे. कातडी कमावणे हा पारंपारिक व्यवसाय नात्यातील लग्नसंबंधाना मुभा आहे. स्त्रीया कांही सण स्वतंत्र साजरे करतात. स्त्रिला कुटुंबांत मानाचे स्थान आहे.

१२. **महादेव कोळी** – महाराष्ट्रातील पुढारलेली आदीवासी जमात आहे. कुटुंबात स्त्रीला मानाचे स्थान आहे. सणवार, विधी महत्वाचे मानतात. पशुपालन शेती आदी कामात स्त्री पुरुषाला मदत करते. विवाहासंबंधी लवचिकता बाळगली जाते.

१३. **मल्हार कोळी** – पुरुषप्रधान आईवडील नात्यांना विशेष महत्व आहे. साडी चोळी पोशाख आहे. विधवा विवाहास व घटस्फोटास परवानगी आहे.

१४. **कोरकू** – कोरकू ही विदर्भातील एक मोठी आ.ज. आहे. त्यांचा पारंपारिक व्यवसाय शेती आहे.
विवाह वय १५ ते २० मुलगा, १२ – १७ मुलगी आहे. विधवा विवाह व घटस्फोट समाजमान्य आहे. स्त्रीयांना दागिन्यांची आवड आहे.
स्त्रिया लुगडे व चोळी वापरतात आपली संस्कृतिक जीवनपध्दती त्यांनी अजूनही सोडलेली नाही.

१५. **परधान** – परधान गोंड राजाचे कवी व इतिहासकार म्हणून काम पाहत नंतर मात्र शेती व्यवसाय स्विकारला. पुरुषप्रधान असुनही वधुदक्षिणेची पध्दत अस्तित्वात आहे. परधानांची स्वतःची अशी पारंपारिक सामाजिक बैठक असते.

१६. **गोंड** – गोंडाची विशेष प्रथा म्हणजे गोदूल. वयात आलेली मुले – मुली एकत्र राहतात. मैत्री जमून लग्नेही होतात.
जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य व मुल्याची प्रथा आहे. विवाहित स्त्रीला घटस्फोट घेण्याचा अधिकार आहे. पुनर्विवाहाची पध्त आहे. विधवा विवाह सुध्दा प्रचलित आहे. स्त्रीया कष्टाळू असतात

१७. **गोवारी** – यांचा उल्लेख डॉ. इरावती कर्वे यांनी नागपूर प्रांतातील गुराखी असा केला आहे. गोंडाप्रमाणेच यांच्यातही विधवेचे दिराशी लग्न होते० ही कुंटुंब पध्दती मातृप्रधान आहे.

१८. **माना** – माना ही गोंडाचीची उपजात वधमुल्यांची प्रथा आहे. यावरुन मुलीचा जन्म स्वामताई मानतात. विवाहासाठी अनेक कुळात विवाहाची परवानगी आहे.

१९. **माडीया** – परंपरागत शिकारी आहेत. भामरागड हे माडियांचे प्रमुख ठिकाण आहे. महाराष्टातील माडिया ही एक प्राचीन आदीवासी जमा आहे. गोटूल मधूनच अविवाहीत मुले – मुली आपला जोडीदार निवडतात.

२०. **पारधी** – पारध पासून पारधी पारध म्हणजे शिकार करणे. पारधी संस्कृती पुरुषप्रधान आहे. वधुदक्षिणा घेतला जाते. पण विधवा विवाहस मन्यता आहे. घटस्फोट मान्य केला जातो प्रगतीच्या संपर्काने त्यांच्यातही हुंडा प्रथा येत आहे.
पारधी स्त्रीया व्यावहारिक जीवनातही हातभार लावतात.

२१. **ठाकर** – पितृसत्ताक जमात वेगवेगळया कुळामध्ये लग्न केले जाते. विधवा विवाहास माचता आहे.

२२. **वारली** – वारली कुटुंब पुरुषप्रधान आहे. स्त्रियांचा आर्थिक गोष्टीत सहभाग असतो. आईवडील नात्यांचा धार्मिक व सामाजिक विधीत महत्वाचा भाग असतो. लग्नाआधी शारिरीक संबंध ठेवण्यास मुभा असते. विधवा विवाहास मान्यता आहे.

- **आदिवासी स्त्री व सामाजिक स्थान :–** नागरी समाजातील स्त्रीच्या तुलनेत ती आधिक स्वतंत्र आहे. आदिवासी समाजात स्त्रियांना कमीपणाची वागणूक दिली जात नाही. आदिवासी स्त्री दैनंदिन जीवनात कष्टाची कामे करते.

आर्थिक सामाजिक आणि धार्मिक कार्या आदीवासी स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने सहभागी असतात. अनेक आ.जमातीत मुलगा – मुलगी यांचा दर्जा सारखाच असतो. वंधाचा दिवा ही समजूत दृढ नाही. खालील स्त्री पुरुष प्रमाणावरुन दिसते.

| **वर्ष** | **आ.स्त्री** | **प्रा.स्त्री** |
|---|---|---|
| १९६१ | ९८७ | ९४१ |
| १९७१ | ९८२ | ९३० |
| १९८१ | ९८३ | ९३५ |
| १९९१ | ९७२ | ९२७ |

म्हणजेच आ.स्त्रियांची संख्या इतर समाजातील स्त्रियांच्या संख्येपेक्षा कायमच अधिक राहिली आहे. मुलीच्या लग्नात मुलाकडून मुलीच्या आ.विवाहपध्दतीवरुन से लक्षात येते की स्त्रीच्या मताचा विचार अधिक केला जातो. जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य तिला असते. तसेच घटस्फोटचाही अधिकार तिला आहे.

आ.सांस्कृतीतील युवागृहातुन मुलीला जमातीच्या चालीरीती, प्रथा व संस्कृतीचे ज्ञान मिळते. बाळंतपण घरातच होते. विधवेला आपल्या पतीच्या मालमत्तेत वाटा मिळतो. विधवेचा पुनर्विवाह होतो. आदिवासी स्त्री नव–याला देव मानत नाही.

आ.चा.मुख्य व्यवसाय शेती शेतीतील सर्व कामात स्त्री मदत करते. काही धार्मिक विधीही स्त्री स्वतंत्रपणे करते.

आ.स्त्री पुरुषांप्रमाणेच दारु, तंबाखु खातात. सर्वसामान्यांच्या मनातील आ.स्त्रीची प्रतीमा दुषित आहे. पण खरी आ.स्त्री स्वच्छंदी, कष्टाळू संसार पुढे नेणारी आहे.

आ.स्त्रीला समाजात आणि धार्मिक जीवनात मानाचे स्थान आहे. कुटुंबाचा वंश ती पुढे नेते यावरुन आ.स्त्रीचा दर्जा स्पष्ट हेतो. युवागृह संस्कृतीचे जतन, समानता या परंपरेतून ती स्वतःचे स्वातंत्र्यच सुचित करते.

आ.स्त्रीयांच्या समस्याही भरपूर आहेत. आरोग्य, अज्ञान, कुपोषण शिक्षण विषयीची परिस्थिती तर अत्यंत नाजूक आहे. बोलीभाषा आणि शिक्षण यांचा ताळमेळच लागत नाही. याशिवाय शिक्षक विद्यार्थी नातेही निर्माण होवू शकत नाही.

प्रगतांच्या संपर्काने आदिवासी सांस्कृतिक संभ्रमात पडले आहेत. साहजीकच आ.स्त्री जीवनावर ही प्रगत जीवनाचा आधूनिक जीवनाचा प्रभाव पडलेला आहे. पण नव्या जुन्याचा तणाव कायम आहे.

- **आदिवासी स्त्री व कुटूंब**

आदिमांच्या जीवनात कुटुंबाचे स्थान महत्वपूर्ण आहे. आदिवासे समाजात कुटुंबात अकृत्रिम प्रेम असते. स्त्री कुटुबांची सर्व कार्य पार पाडते. शैक्षणिक, नियंत्रणाचे, आर्थिक, बालसंगोपन, संवर्धन धार्मिक, समाज बंधनाचे जतन, संस्कृतीचे जतन हे स्त्रीनेच केले आहे.

इतर समाजातील स्त्रीयापेक्षा आ.स्त्री ही अधिक मागासलेली दिसते. आ.स्त्री ही इतर स्त्रीपेक्षा निर्भिड आहे. बेडर आहे. संघर्ष करणारी आहे. त्यामुळे संसाराच्या सारीपाटावर सातत्याने आपल्या जोडीदाराच्या समवते असल्याचे दिसते सु.ना. पान २३

- आ.स्त्री व सामजिक कार्यातील सहभाग.
- आदिवासी स्त्री जमाती अंतर्गत आणि प्रगत संपर्कामुळे गावातही कार्य करताना दिसते. पोशाखातील दागिन्यातील बदल तीला प्रगतांपर्यंत पोहोचवतो आहे. स्वतःच्या जमातीसाठी जातपंचायत प्रमुख म्हणूनही काम पाहते आहे. जमाती अंतर्गंत समाज संघटन टिकवून ठेवण्याचे कार्य आ.स्त्री करते आहे. सा.संघटनांचे कार्य करत आहोत.

- **राजकीय कार्य**

जमात प्रमुख, सरपंच व विविध राजकीय पदांवर आ.जमातीतील स्त्रीया कार्य करत आहेत उदा. पारधी महिला सरपंचपद भुषवित आहेत. विविध सा.राजकीय क्षेत्रात महत्वाची भूमिका बजवात आहेत.

- **आर्थिक**

आ.स्त्री भीक मागण्यापासून ते शिकून मोठया पदापर्यंत मजल मारुन आर्थिक क्रियेत पूर्वीपासून ती सक्रीय सहभागी आहे. आ.कर्जबाजारी पणात बुडालेला आहे. उपजिवीकेचे साधन उपलब्ध नयतानाही आहे. त्या स्थितीत राह आहे.

- **शैक्षणिक विचार / स्थिती**

महाराष्ट्राला आ.स्त्रीच्या ४ विभागात अंदाजे ५०० आश्रमशाळा आहेत. पण त्या फारशा प्रभावी ठरल्या नाहीत. शिक्षण हे कोणत्याही समाजाच्या सुधारणेचा पाया आहे. मागासलेल्या समाजात शिक्षणाशिवाय प्रगती होत नाही.

- १९७९ च्या जनगणनेतील आ.च्या साक्षरतेचे प्रमाण ११ टक्के ऐवढे आहे. त्यात पुरुष ०७ टक्के व स्त्रिया ४ टक्के आहेत. महाराष्टातील खेडयात आ.मुलांचे प्रमाण ३६ टक्के ऐवढे आहे. आ.स्त्रीयांची शिक्षणाकडे बघण्याची मानसिकता उदास आहे. तरीही कांही महिला प्रगत प्रवाहात येत आहेत.
- लोककला / लोकगीतामध्ये आ.स्त्री

आ.स्त्रीचे जीवन सर्वहारा, कष्टमय असल्यामुळे त्यांच्या लोकगीतां मधून उपमा, प्रतिमा, **दृष्टांत** आलेले असल्यामुळे वेगळी अनुभूती देतात. आ.लोकगीतांतील स्त्री जीवनाचे वेगळेपण त्यांच्या अनुभूती अभिव्यक्ती पहावयास मिळतात. आ.स्त्री लोकगीते जीवन वाटतात. स्त्री जीवनाच्या विविध अवस्थांचे अंतर्बाहय असे निर्मळ प्रतिबिंब लोकगितांत पहावयास मिळते.

स्त्री कधीही एकटी आत नाही. दोन ३ स्त्रीया मिळुनच गातात प्रसंगाला अनुरुप गीते रचलेली असतात.

आ.स्त्री लिखित स्वरुपात नाहीत. मौखिक परंपरेच्या माध्यमातून पिंढयात पिढया ती टिकुन आहेत.

- आ.स्त्रीने संस्कृतीचे जतन केले आहे. आदीवसी सणसमारंभ धर्माचरण, विवाहप्रथा, आप्त संबंध नैतिक नियम, निसर्गावरील श्रध्दा, पोशाख इ. सर्वच बाबतीत आ.स्त्रीने संस्कृतीचे जतन केले आहे. प्रगत संपर्काने या संस्कृतीवर प्रभाव टाकला आहे. स्वातंत्र्या सोबतचा संस्कृतीची बंधने सोबत घेवून जाणारी आ.स्त्री ही स्वतंत्रयकृतीची आहे.

## • सारांश –

आजच्या परिस्थतीत आदिवासी स्थायिक झालेले आहेत कांही भटकंती करीत आहेत. आ. संस्कृतीत संभ्रमावस्था आली आहे. कारण प्रगतांच्या संपर्काने संस्कृती बोली भाषा, युवागृह, जमीन, रोजगार शिक्षण यामुळे धोक्यात आले आहे. स्त्री साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प आहे.

आज स्त्री स्वातंत्र्याचे वारे वाहते आहे. पण आजच्या सुशिक्षित म्हणून वावरणा-या स्त्रीला खरंच एवढ स्वातंत्र आहे का? शिक्षण संस्कृती माणसाला काय शिकवते? समानता ? मग ती स्त्री पुरुष गरीब, श्रीमंत, श्रेष्ठ – कनिष्ठ यातील भारतीय स्त्रीयांच्या तुलनेत आ.स्त्री ही ख-या अर्थाने स्वतंत्र आहे. तिला कुटुंबात समाजात व इतर विविध क्रियांमध्ये मानाचे स्थान आहे. विधवांचा प्रश्नच तेथे निर्माण होत नाही. स्त्रीचे पुरुषांवरच परावलंबन दिसत नाही. घटस्फोटासाठी निष्ठत बसावं लागत नाही. स्त्रीपेक्षा माणूस म्हणून जगण्याचा मान तीला तीच्या जमातीने दिला आहे. यातही तीचा मागासलेपणा दूर करण्यासाठी त्यांची भाषा, संस्कृती, शिक्षण, जीवनविषयक तत्वज्ञान यासाठी जणजागणरण करणे गरजेचे आहे.

१. दास, शिवतोष. १९८३. भारती की जनजातीयॉं. दिल्लाी : किताबघर प्रकाशन, पृ.क्र.९५.
२. दास, शिवतोष १९८३. कित्ता, पृ.क्र.९५.
३. तिवारी, व्ही.के. १९८७ भारती की जनजातीयॉं, मुंबई : हिमालय पब्लिशिंग हाऊस, पृ.क्र.१.
४. Heredia, R.C. 2000. ibid PP-1523-1525
५. Utpreti, Harishchandra. 1970. Indian Tribes Smajik vigyan Hindi Rachna Kendra, New Delhi: Rajasthan Vishwavidyalaya. PP.1.
६. Hutton, J.H. 1938. Census Report of India 1931, Vol.1 New Delhi.P.1
७. Elwin, V. 1939 The Baiga, London: Macmuliam publication PP.519.
८. Baines,A. 1891. Census of India, 1891 Report. Vol.1. PP. 158, P.320.
९. Xaxa, Virginus. 1999. ibid. PP – 3391
१०. Census of India, 1961 Colpart. V-B (II) PP.2-3
११. Kroeber, A.L. 1948 Anthoropology (reviseded) New: York Harcourt, Prass & Co. P. 238. Anthoropology, Harcourt, Brace & Co. New York.
१२. Shrikant, M.L.C., Classification of Tribes in Tribal Soveniar, PP 13.
१३. Ghurye, G,S, 1943. The Aborigines so-called and their future, Poona: Published by D.R. Gadgil, PP 36.